RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १५६] शुक्रवार, डिसेंबर १६, २०२२/अग्रहायण २५, शके १९४४ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४७५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ डिसेंबर २०२२.

**अधिसूचना**

**धुळे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२२.**

क्रमांक. धुमपा-२०२१/प्र.क्र.१३९/नवि-२५.— धुळे महानगरपालिकेमध्ये अंमलात असलेले सध्याचे धुळे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ यामध्ये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) अंतर्गत सुधारणा करण्यासाठी याद्वारे पुढील नियम करण्यात येत आहेत :—

**नियम**

१. **संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :—**

(१) या नियमांना “धुळे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) (सुधारणा) नियम, २०२२” असे संबोधण्यात येईल.

(२) हे नियम अंतिमरित्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

(३) या नियमांन्वये, धुळे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा उल्लेख “मुख्य नियम” असा करण्यात आला आहे) च्या परिशिष्ट (२) मधील अनुक्रमांकासमोरील पदांच्या “नेमणुकीची पद्धत व टक्केवारी” आणि “नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती” यामध्ये खालील तक्त्यातील उक्त क्रमांकासमोरील पदासमोर दर्शविल्यानुसार सुधारणा करण्यात येत आहे. तसेच काही पदांचे सेवा प्रवेश नियम नव्याने समाविष्ट करण्यात येत आहेत.

(४) मुख्य नियमांतील परिशिष्ट (२) मध्ये, पदोन्नती कोट्यातील पदांवर पदोन्नतीसाठी निम्न संवर्गातील पदावर किमान ०५ वर्षे सेवेच्या अनुभवाची अट विहित करण्यात आली आहे. या अनुषंगाने, “धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क (वर्ग-३) पासून गट-अ (वर्ग-१) मधील सर्व टप्प्यांपर्यंतच्या आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना, निकटतम निम्न संवर्गातील पदावर किमान ०३ वर्षांच्या नियमित सेवेची अट पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून राहील व त्यामध्ये कोणतीही शिथिलता अनुज्ञेय असणार नाही,” अशी मुख्य नियमांत सुधारणा करण्यात येत आहे.

धुळे महानगपालिका, धुळे ( सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) (सुधारणा), नियम २०२२

## परिशिष्ट-२

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ व ५३ (१) चे तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिका-यांच्या पदांसाठीची कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहित शैक्षणिक व इतर अर्हता ( पहा ( नियम ३))

| **अ क्र** | **पदनाम (सेवा व संवर्ग)** | **नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती** | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ३ | उपायुक्त<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी -१ ) | पदोन्नती<br>५० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) महानगरपालिकेच्या सेवेतील सहाय्यक आयुक्त या पदावरील ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक. सेवाजेष्ठता व गुणवत्ता या तत्वावर, **किंवा** सहाय्यक आयुक्त पदावरील अधिकारी उपलब्ध नसल्यास प्रशासकीय सेवेतील समकक्ष पदावर कार्यरत अधिका-यास विहित अनुभव व सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>क) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. |
| | | प्रतिनियुक्ती<br>५० % | राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी.<br>(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५ प्रमाणे) |
| ५ | महिला व बालविकास अधिकारी<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - १ ) | प्रतिनियुक्ती/<br>पदोन्नती<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची समाजशास्त्र शाखेची पदवी किंवा कोणत्याही शाखेतील पदवी आणि M.S.W. पदव्युत्तर पदवी<br>ब) महानगरपालिकेच्या सेवेतील सहाय्यक आयुक्त किंवा प्रशासकीय सेवेतील सहाय्यक आयुक्त पदास समकक्ष पदावरील ०३ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) एकत्रित सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या तत्वावर पात्र अधिकाऱ्याची पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>ड) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य.<br>इ) वरील पात्रता असलेला अधिकारी पदोन्नतीसाठी उपलब्ध नसल्यास शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाच्या समकक्ष अधिकारी किंवा नगरविकास विभागाच्या मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ६ | अधिक्षक / प्रभाग अधिकारी /मुख्य लिपीक<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | पदोन्नती<br>१००% | अ) महानगरपालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक / वरिष्ठ सहाय्यक /निरीक्षक चेकर/स्वीय सहाय्यक संवर्गातील पदावरील ३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचा-याची पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य. |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ७ | सांख्यिकी अधिकारी<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | पदोन्नती<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची सांख्यिकी विषयासह पदवी.<br>ब) सांख्यिकी सहायक या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>क) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य. |
| ८ | सांख्यिकी सहायक<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | पदोन्नती<br>१०० % | अ) मान्यप्राप्त विदयापीठाची सांख्यिकी विषयासह पदवी धारण केलेल्या महापालिका आस्थापनेवरील लिपीक या संवर्गात किमान ०३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचा-यास जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य. |
| ९ | लघुलेखक उच्च श्रेणी<br>(मराठी / इंग्रजी )<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | पदोन्नती १०० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील लघुलेखक (निम्नश्रेणी) मराठी /इंग्रजी या पदावरील ०३ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>क) राज्य शासनाची इंग्रजी अथवा मराठी लघुलेखनाची १२० श.प्र.मि. व शासनाची (जीसीसी) टंकलेखनाची ४० श.प्र.मि. वेगाची परीक्षा उत्तीर्ण.<br>ड) एम. एस. सी. आय.टी परीक्षा उत्तीर्ण.<br>इ) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य. |
| १० | लघुलेखक निम्न श्रेणी<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | नामनिर्देशन<br>५० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाची इंग्रजी / मराठी लघुलेखनाची १०० श. प्र. मि. व शासनाची (जीसीसी) टंकलेखनाची ४० श.प्र.मि. परीक्षा वेगाची परिक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत M.S.C.LT. किंवा D.O.E.A. C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C. C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र,<br>ड) विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य. |
| | | पदोन्नती<br>५० % | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक किंवा समकक्ष पदावरील ०३ वर्षांचा अनुभव धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | |
| १२ | लिपीक /संगणक लिपीक / टंकलेखक / भांडार लिपीक (प्रशासकीय सेवा श्रेणी - ३ ) | नामनिर्देशन<br>५० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखनाची ३० शप्रमि (जीसीसी ) इंग्रजी टंकलेखन ४० शप्रमि परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत M.S.C.LT. किंवा D.O.E.A. C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C. C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र,<br>ड) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक |
| | | पदोन्नती<br>५० % | अ) एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील चतुर्थ श्रेणीतील पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| २४ | सिस्टीम मॅनेजर ( तांत्रिक सेवा ) | पदोन्नती<br>१०० टक्के | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सिस्टीम ॲनलिस्ट या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल |
| २५ | सिस्टीम ॲनालिस्ट ( तांत्रिक सेवा ) | पदोन्नती<br>१०० टक्के | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (B.E. Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील नेटवर्किंग ॲडमिनिस्ट्रेटर / संगणक प्रोग्रॅमर या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल |
| २६ | कनिष्ठ अभियंता नेटवर्किंग (नेटवर्किंग ॲडमिनिस्ट्रेटर) ( तांत्रिक सेवा ) | पदोन्नती<br>१०० टक्के | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) महापालिका आस्थापनेवरील संगणक विभागात किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल<br>क) नेटवर्किंग व हार्डवेअरचा किमान ०६ महिन्यांचा किंवा ०१ वर्षाचा कोर्स आवश्यक.<br>ड) निम्न विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य |
| २७ | संगणक प्रोग्रॅमर ( तांत्रिक सेवा ) | नामनिर्देशन<br>५० टक्के | अ) मान्यताप्राप्त विदयापीठाची संगणक अभियांत्रिकी पदवी (B.E. Computer) समकक्ष अर्हता.<br>ब) डेटा सेंटर ॲडमिनीस्ट्रेटर नेट वर्किंग (लॅन वॅन कंपाउंड हार्डवेअर) मधील ५ वर्षाचा अनुभव तसेच हॅकर्स मधील २ |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | वर्षाचा अनुभव |
| | | पदोन्नती<br>५० टक्के | नामनिर्देशनाने विहित केलेली अर्हता धारण करणा-या धुळे महानगरपालीकेच्या आस्थापनेवरील संगणक लिपीक या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पुर्ण करणा-या कर्मचा-यांची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल |
| ३० | लेखाधिकारी<br>(लेखा सेवा श्रेणी -२) | पदोन्नती<br>/प्रतिनियुक्ती<br>१०० % | अ) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखापाल या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल<br>ब) विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण होणे अनिवार्य.<br>**किंवा** वरील पात्रता असलेला अधिकारी पदोन्नतीसाठी उपलब्ध नसल्यास शासनाच्या महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील समकक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ३१ | लेखापाल<br>(लेखा सेवा श्रेणी -३) | पदोन्नती<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणीज्य शाखेची पदवी किवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डीएफएम ) किंवा G.D.C & A परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>क) विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण होणे अनिवार्य.<br>ड) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उप लेखापाल या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ३२ | उपलेखापाल<br>(लेखा सेवा श्रेणी -३) | पदोन्नती<br>१०० % | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणीज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डीएफएम ) पदविकास अथवा L S G.D किंवा G.D.C & A परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>क) महानगरपालिका कनिष्ठस्तर विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या वरिष्ठ लिपीक (लेखा) या पदावरील किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ३३ | रोखपाल<br>(लेखा सेवा श्रेणी -३) | पदोन्नती<br>१०० % | (अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणीज्य शाखेची पदवी किवा समकक्ष अर्हता<br>(ब) विभागीय परिक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या लेखा लिपिक या पदावरील किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | **नेमणुकीची पध्दत व टक्केवारी**<br>**१ नामनिर्देशन**<br>**२ पदोन्ती**<br>**३ प्रतिनियुक्ती** | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ३६ | लेखा परिक्षक<br>(लेखा सेवा श्रेणी - ३) | पदोन्नती<br>१००% | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणीज्य शाखेची पदवी धारण केलेल्या धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>ब) विभागीय परिक्षा (लेखा) उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ३९ | महानगरपालीका नगर सचिव<br>(सचिव )<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी १ ) | पदोन्नती<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. विधी शाखेचा पदवीधर/पदव्युत्तर पदवीधारकास प्राधान्य.<br>ब) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील महापालिका उपसचिव या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४० | उपनगरसचिव<br>(प्रशासकीय सेवा श्रेणी २) | पदोन्नती<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) महानगरपालिका सेवेतील नगर सचिव विभागात वरिष्ठ सहायक या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या कर्मचा-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>क) विधी शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य. |
| ४४ | प्रमुख माळी<br>( उदयान सेवा श्रेणी ४) | पदोन्नती<br>१००% | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) महापालिका आस्थापनेवरील बागमाळी या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ४६ | उद्यान मजुर<br>( उदयान सेवा श्रेणी ४) | नामनिर्देशन<br>१००% | अ) ७ वी परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी, हिंदी, वाचता, बोलता व लिहीता येणे आवश्यक. |
| ४७ | मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी<br>(कर सेवा श्रेणी १) | प्रतिनियुक्ती<br>१००% | मुख्याधिकारी, नगरपालिका वर्ग-१ पदावरील ०५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |
| ४८ | सहा. मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी<br>(कर सेवा श्रेणी २) | प्रतिनियुक्ती<br>१००% | मुख्याधिकारी, नगरपालिका वर्ग-२ पदावरील ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ४९ | समाज विकास अधिकारी (प्रशासकीय सेवा श्रेणी — २) | पदोन्नती १००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी आणि M.S.W. पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ब) धुळे महानगरपालिका आस्थापनेवरील अधिक्षक किंवा समकक्ष पदाचा ०३ वर्षांचा अनुभव असलेल्या अधिका-याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ५० | शहर अभियंता (अभियांत्रीकी सेवा श्रेणी — १) | प्रतिनियुक्ती १००% | राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्याकडील अधिक्षक अभियंता किंवा कार्यकारी अभियंता संवर्गातील अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| ५१ | कार्यकारी अभियंता ( स्थापत्य / पा पु विभाग ) (अभियांत्रीकी सेवा श्रेणी — १) | प्रतिनियुक्ती ५०% | राज्य शासनाच्या उप अभियंता संवर्गातील अधिका-याच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| | | पदोन्नती ५०% | अ) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदवी परिक्षा (स्थापत्य) उत्तीर्ण असलेल्या उपअभियंता या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या अधिका-याची किंवा,<br>ब) किमान ०३ वर्षांचा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण असलेल्या उप अभियंता या पदावर किमान ०७ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>परंतू केवळ पदवीधारक पात्र उमेदवार पदोन्नतीसाठी उपलब्ध नसेल तरच पदविकाधारक उमेदवार पदोन्नतीस पात्र असेल. |
| ५२ | उप अभियंता (स्थापत्य / पाणीपुरवठा ) (अभियांत्रीकी सेवा श्रेणी — १) | प्रतिनियुक्ती ५०% | राज्य शासनाच्या उप अभियंता संवर्गातील अधिका-यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| | | पदान्नती ५०% | अ) धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदवी परिक्षा (स्थापत्य) उत्तीर्ण असलेल्या शाखा अभियंता या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या अधिका-याची किंवा,<br>ब) किमान ०३ वर्षांचा स्थापत्य अभियांत्रिकी पदविका उत्तीर्ण असलेल्या शाखा अभियंता या पदावर किमान ०७ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या अधिकाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल.<br>परंतू केवळ पदवीधारक पात्र उमेदवार पदोन्नतीसाठी उपलब्ध नसेल तरच पदविकाधारक उमेदवार पदोन्नतीस पात्र असेल. |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| ५३ | शाखा अभियंता<br>( स्थापत्य / पा पु / अभियंता)<br>(अभियांत्रीकी सेवा श्रेणी – २) | नामनिर्देशन<br>१००% | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी/पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) समसकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>क) पदवीधारक कनिष्ठ अभियंता नियुक्तीपासून तर पदविकाधारक कनिष्ठ अभियंता नियुक्तीच्या दिनांकापासून ०५ वर्षांनी शाखा अभियंता समजण्यात येईल. |
| ५६ | अभियांत्रिकी सेवा<br>वर्ग-३<br>इले. इंजिनिअर | नामनिर्देशन<br>५०% | अ) शासनाच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.ई.ई. पदवी.<br>ब) शासनाच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनीअरींग परीक्षा उत्तीर्ण व ०३ वर्षाचा कामाचा अनुभव |
| | | पदोन्नती<br>५०% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महानगरपालिका आस्थापनेवरील पंप ऑपरेटर या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ७७ | (निम आरोग्य सेवा) क्षेणी-३<br>स्वच्छता निरीक्षक | नामनिर्देशन<br>५०% | अ) उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्यताप्राप्त संस्थेची स्वच्छता निरीक्षक पदविका परीक्षा उत्तीर्ण.<br>क) शासनमान्य विद्यापीठाची पदवी विशेषत: शास्त्र शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य.<br>ड) स्वच्छता निरीक्षक म्हणून अनुभव असल्यास विशेष प्राधान्य. |
| | | पदोन्नती<br>५०% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महानगरपालिका आस्थापनेवरील मुकादम अथवा सफाई कर्मचारी या पदावर किमान ०३ वर्षाची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्याची सेवा जेष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १०८ | (अग्निशमन सेवा)<br>अग्निशमन अधिकारी | पदोन्नती<br>१००% | धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहा. अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १०९ | (अग्निशमन सेवा)<br>सहा. अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन/<br>पदोन्नती<br>२५% | **१.नामनिर्देशन**<br>**अ) शैक्षणिक पात्रता**<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय/राज्य अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेकडील Station Officer & Instructor पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील प्रगत पदविका) उत्तीर्ण असावा किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्षे कालावधीचा उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | केलेला असावा, किंवा The Institution of Fire Engineers (UK/India) या संस्थेकडून Grade-१ ही पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. (लिहीणे,वाचणे व बोलणे)<br>**ब) किमान शारीरीक पात्रता**<br>१) उंची -१६५ सें.मी.,(महिला उमेदवारांची उंची १६२ से.मी.),<br>२) छाती — साधारण ८१ सें.मी. फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)<br>३) वजन- ५० कि.ग्रॅम.<br>४) दृष्टी - चांगली<br>**क) अनुभव** - 'ड' वर्ग महानगरपालिकामध्ये सहाय्यक अग्निशमन अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान ३ वर्षे सेवा पूर्ण केलेली असल्यास प्राधान्य.<br>**ड) वयोमर्यादा** -<br>१) उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त असु नये.<br>२) शासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही. |
| | | पदोन्नती ७५% | नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील फायरमन या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| १०९ | (अग्निशमन सेवा) फायरमन | पदोन्नती १००% | धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहायक फायरमन या पदावर किमान ०३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ११० | (अग्निशमन सेवा) सहायक फायरमन | नामनिर्देशन १००% | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.<br>ब) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा ६ महिने कालावधीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठ्यक्रम पुर्ण.<br>**क) शारीरिक पात्रता :-**<br>१) उंची - किमान १६५ सें.मी. (महिला उमेदवारांची उंची किमान १६२ सें.मी.)<br>२) छाती - साधारण ८१ सें.मी., फुगवून ५ सें.मी. जास्त (महिला उमेदवारांसाठी लागू नाही) |

| अ क्र | पदनाम (सेवा व संवर्ग) | नेमणुकीची पध्दत व टक्केवारी<br>१ नामनिर्देशन<br>२ पदोन्ती<br>३ प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पध्दती |
|---|---|---|---|
| | | | ३) वजन - किमान ५० कि.ग्रॅ.<br>४) दृष्टी - चांगली.<br>ड) **वयोमर्यादा** — उमेदवाराचे वय ३० वर्षांपेक्षा अधिक असू नये. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शं. त्र्यं. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.